



# ONE DAY INTERDISCIPLINARY NATIONAL CONFERENCE ON 'THOUGHTS OF MAHATMA GANDHI : YESTERDAY, TODAY & TOMORROW'

**Organized by**

Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded

&

Department of History, Economics & Philosophy

## KARMAYOGI TULSHIRAM PAWAR MAHAVIDYALAYA, HADOLTI

Tq. Ahmedpur Dist. Latur (M.S.)

NAAC Accredited With 'B' Grade

**Saturday 28th October 2023**




Impact Factor - 7.9 (SRJIF)

# उदयगिरी बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

ISSN - 2583-8423 (Online)
https://udayagiri.aaassher.org

A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History September - October - 2023 (ISSUE No - 04)

Chief Editor
**Dr. Anant N. Shinde**
Udayagiri Bahubhashik Itihas Sanshodhan Patrika

Executive Editor
**Dr. Deepak Bachewar**
Principal
Karmayogi Tulshiram Pawar Mahavidyalaya, Hadolti Tq. Ahmedpur Dist. Latur

Editors
**Dr. Ramesh Gangthade**
**Dr. Raosaheb Ingle**
**Dr. Suvarna Tenkale**

Scanned with CamScanner

## Table of Content


| Sr. no. | Title of the paper | Page no. |
|---|---|---|
| 1 | महात्मा गांधीची नई तालिम, एक संक्षिप्त विश्लेषण<br>- हारके रागिणी शिवलिंग | 823 – 826 |
| 2 | महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांचा परामर्श<br>- प्रा. डॉ. अनिल दिगंबर वाडकर | 827 – 833 |
| 3 | महात्मा गांधी यांचे सत्याग्रहाचे विचार<br>- प्रा. डॉ. विजया साखरे | 834 – 840 |
| 4 | गांधीविचाराची वर्तमानकाळातील प्रासंगिकता<br>- प्रा. डॉ. बालाजी गणपतराव भंडारे | 841 – 844 |
| 5 | खेड्याकडे चला - महात्मा गांधी<br>- प्रा. डॉ. अलका बाबाराव सोमवंशी | 845 – 849 |
| 6 | महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्य संकल्पना<br>- प्रा. डॉ. चंदन एम. बावलगावे | 850 – 854 |
| 7 | महात्मा गांधी यांच्या शिक्षण विषयक विचारांची प्रासंगिकता<br>- प्रा. डॉ. व्ही. ए. पवळे आणि प्रा. डॉ. एस. के. लेखणे | 855 – 859 |
| 8 | गांधीजीच्या सत्य व अहिंसेची प्रासंगिकता<br>- डॉ. मुसळे हनुमान | 860 – 863 |
| 9 | महात्मा गांधी यांचे सत्याग्रहासंबंधी विचार<br>- वर्षा भूषण कांबळे | 864 – 867 |
| 10 | महात्मा गांधीजी आणि स्वातंत्र्यसंग्राम<br>- मुंडे सोनाली वामनराव | 868 – 873 |
| 11 | महात्मा गांधीजींची 3H (Head, Hand, Heart) संकल्पना.<br>- आडसुळे आदेश नवनाथ | 874 – 879 |
| 12 | महात्मा गांधीजीं आणि त्याचे स्वदेशी संकल्पना<br>- डॉ. भरत माधवराव मुस्कावाड | 880 – 885 |
| 13 | महात्मा गांधीजींचे महिलाविषयक विचार<br>- प्रा. डॉ. रजनी अनंतराव बोरोळे | 886 – 890 |
| 14 | Mahatma Gandhi's Views on the Indian Economy: A Path to Self-Reliance and Social Justice<br>- Dr. S. B. Shaikh | 891 – 893 |
| 15 | 'एकदश व्रत' : गांधीजीची नैतिक जीवन पद्धती<br>- डॉ. शितल येरुळे | 894 – 899 |




Scanned with CamScanner

Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 855 – 859

Original Research Article

# महात्मा गांधी यांच्या शिक्षण विषयक विचारांची प्रासंगिकता

प्रा. डॉ. व्ही. ए. पवळे आणि प्रा. डॉ. एस. के. लेखणे

श्री मधुकरराव बापुराव पाटील खतगावकर महाविद्यालय, शंकरनगर ता. बिलोली जि. नांदेड ४३१७२२ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: pavaleva2011@gmail.com

## प्रस्तावना

महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली अहिंसक मार्गाने चालविलेला ब्रिटिशांविरुद्धचा स्वातंत्र्यलढा 15 ऑगस्ट 1947 रोजी भारताच्या स्वातंत्र्यांने यशस्वी झाला. अहिंसा आणि सत्याग्रह या तत्त्वांचा प्रभाव आणि परिणाम जगाने पाहिला. गांधीजींच्या राजकीय तत्त्वज्ञानाने लोक जसे भारावून गेले तसेच त्यांच्या आर्थिक, सामाजिक, अध्यात्मिक आणि शैक्षणिक विचारांचेही लोकांना महत्त्व प्रत्ययास येऊ लागले. कारण गांधीजींनी आपले विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी अनेक प्रयोगही केले होते. त्यांचे विचार हे आदर्शवादी वाटत असले तरी ते मुलगामी स्वरूपाचे होते. त्यांचे विचारविश्व हे पौर्वात्य विचार आणि पाश्चिमात्य विचार यांच्या प्रभावातून विकसित झालेले होते. त्यांच्या विचारांना मूल्यांचा आधार होता, म्हणूनच त्यांचे विचार हे चिरंतन आणि नेहमीच प्रासंगिक वाटतात. सध्या राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 ची देशभर चर्चा सुरू आहे, या धोरणाचा मसुदा आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी याविषयी अनेक मतमतांतरे शैक्षणिक वर्तुळातील अभ्यासकांमध्ये दिसून येत आहेत. प्रचलित शिक्षण पद्धतीतील दोष दूर करून रोजगाराभिमुख, कौशल्यधारीत तसेच मूल्य शिक्षणावर भर देणारे शैक्षणिक धोरण म्हणून या राष्ट्रीय शिक्षण ।धोरणाकडे पाहिले जात आहे. परंतु खरे पाहिले तर रोजगाराभिमुखता, कौशल्यांचा विकास करणारे शिक्षण आणि नीतिमूल्यांना महत्त्व या सर्व बाबी भारतीय संस्कृतीमध्ये आणि त्यातील शैक्षणिक विचारांमध्ये आपल्याला दिसून येतात. याचा संदर्भाने महात्मा गांधींनी आपल्या शैक्षणिक विचारात नीतीमूल्यांना व श्रमांना महत्त्व दिलेले दिसून येते. नैतिक विकास किंवा चारित्र्य विकास हे शिक्षणाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे असा त्यांचा विश्वास होता. गांधीजी आपल्या शैक्षणिक विचारात व्यक्तीच्या आध्यात्मिक व



Scanned with CamScanner

आत्मिक विकासास सुद्धा महत्त्व देत होते. प्रस्तुत संशोधन लेखांमध्ये आपण महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार आणि त्या विचारांची प्रासंगिकता अभ्यासणार आहोत.

**संकल्पना स्पष्टीकरण**

शिक्षणाची संकल्पना स्पष्ट करताना अनेक अभ्यासकांनी व विचारवंतांनी वेगवेगळया स्वरूपात मते मांडलेली दिसून येतात. स्वामी विवेकानंद म्हणतात की, आदर्श शिक्षण हे 'मॅन मेकिंग, कॅरेक्टर बिल्डिंग' असे असावे. चक्रवर्ती राजगोपालचारी एका शाळेच्या समारंभात बोलून गेले की, 'द बेस्ट वे टू एज्युकेट चिल्ड्रन इज थ्रू जॉय ' मुले घडविण्याची उत्तम रीत म्हणजे शिक्षणाचे आनंददायकता. शिक्षण हे कोणीही, कोणाशी आणि कोणत्याही पातळीवर दिले तरी ते आनंददायक असावे, शिक्षण हे रुक्ष किंवा तापदायक नसावे, शिक्षण आनंददायक झाले तरच ते लाभदायक होईल. ज्ञान या परममुल्याच्या प्रकाशात घडणारे ते नित्य नूतन जीवनदर्शन असावे.

महात्मा गांधींनी मात्र शिक्षणासाठी जीवन शिक्षण असा सार्थ शब्द उपयोगात आणला. विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, आर्थिक, नैतिक असा सर्वांगीण सांस्कृतिक विकास व्हावा व त्यांचे वैयक्तिक व सामाजिक जीवन समृद्ध व्हावे, या सर्वकष जीवन विकासाची साधना म्हणजे जीवन शिक्षण हे गांधी विचारांचे सार आहे. श्रम प्रतिष्ठा, ज्ञान प्रतिष्ठा, शील प्रतिष्ठा आणि सेवा प्रतिष्ठा अशा चतुरंग समन्वयातूनच सुसंस्कृत मानव तयार होत असतो असा त्यांचा विश्वास होता.

**संशोधन लेखाचा उद्देश**

प्रस्तुत संशोधन लेखाचा मुख्य उद्देश महात्मा गांधी यांच्या शैक्षणिक विचारांचा आशय समजून घेणे आणि समकालीन शैक्षणिक वातावरणात त्यांच्या विचारांची प्रासंगिकता पाहणे हा आहे.

**तथ्य संकलन**

प्रस्तुत संशोधन लेखासाठी माहिती संकलित करण्यासाठी दुय्यय साधनांचा वापर करण्यात आला आहे, त्यासाठी विषयाशी संबंधित ग्रंथ, पुस्तके,लेख व गांधीजीच्या आत्मकथेचा अवलंब करण्यात आला आहे.

**आशय विश्लेषण**

गांधीजी हे जीवनाचा समग्रपणे विचार करणारे तत्त्वचिंतक होते. शिक्षणाची व जीवनाची फारकत करता येत नाही, हे त्यांनी जाणले होते. म्हणून शिक्षण हा गांधीजींच्या 18 कलमी विधायक कार्याचा अविभाज्य घटक होता. व्यक्तीच्या व समाजाच्या जीवनाला नवे वळण, नवी दिशा द्यावयाची असेल. त्यात परिवर्तन घडवावयाचे असेल तर शिक्षणाकडे फार बारकाईने लक्षपूर्वक पाहिले पाहिजे, शिक्षण हे समाज परिवर्तनाचे व नवनिर्मितीचे प्रभावी साधन आहे, असे ते मानत. ब्रिटिशांच्या आधुनिक शिक्षण पद्धतीची त्यांनी कठोर चिकित्सा करून इंग्रजी भाषा वाघिणीचे दूध असली तरी इंग्रजी माध्यमामुळे व ब्रिटिशांच्या स्वार्थी हेतूमुळे इंग्रजी शिक्षण विष मिश्रित ठरले आहे. हे त्यांनी नवयुवक मधून अनेक लेख लिहून दाखवून दिले. भारतीय जनतेला स्वाभिमानाने जगायला शिकविणारे त्यांना माणूस बनविणारे, त्यांच्या पोटाला उद्योग देणारे, त्यांना चारित्र्यसंपन्न बनवून स्वराज्यासाठी लायक करणारे शिक्षण गांधीजींना हवे होते.

सात लाख खेड्यातील (मुठभर शहरातील नव्हे) जनतेच्या गरजा भागविणारे शिक्षण त्यांना हवे होते. प्रचलित शिक्षण त्या गरजा पूर्ण करू शकत नाही, हे त्यांनी उघड केले. स्वराज्याला लायक होण्यासाठी संस्कारित पिढी तयार व्हावी यासाठी शिक्षण हे आठ वर्ष सक्तीचे व मोफत मातृभाषेतून दिले जाणारे, व्यक्तीचा सर्वांगीण विकास घडविणारे, तसेच सार्वत्रिक शिक्षण मिळणे हा गांधीजींच्या मते स्वराज्या इतकाच प्रत्येक व्यक्तीचा हक्क होता. म्हणून गांधींनी आपल्या आंदोलनामध्ये शिक्षणाला महत्त्व दिलेले दिसून येते. ई.स. 1917 मध्ये चंपारण्यात सत्याग्रहाच्या निमित्ताने गांधीजी गेले असता तेथेही त्यांनी ग्रामशिक्षण सुरू केले, असहकाराच्या आंदोलनाचा राष्ट्रीय शिक्षण हा महत्त्वाचा पैलू होता. इ. स. 1937 मध्ये गांधीजींनी आपले शिक्षण विषयक विचार सुसूत्रपणे राष्ट्रसमोर मांडले. त्यांच्या शिक्षण पद्धतीला वर्धा योजना, मुलोद्योगि शिक्षण, नई तालीम, बुनियादी शिक्षा, बेसिक शिक्षण व अखेर जीवन शिक्षण अशी नमाभिधाने मिळालेली दिसून येतात.

गांधीजींच्या शिक्षण योजनेत मातृभाषेचा अभ्यास आग्रस्थानी असून मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम म्हणून योजले आहे, राष्ट्रभाषा हिंदीला त्यात स्थान आहे, अंकगणित, निसर्ग परिचय, समाज परिचय, चित्रकला व संगीत या सर्वांचा अंतर्भाव आहे. आणि हे सर्व विषय उत्पादक उद्योगाच्या माध्यमातून शिकवायचे आहे आणि त्या उद्योगामुळे शिक्षण स्वयंपूर्ण व स्वावलंबी बनवावयाचे आहे. मुख्य म्हणजे सात वर्षाच्या अखेरीस विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता त्यावेळच्या इंग्रजीविना बाकी बाबतीत मॅट्रिकच्या तोडीचे गांधीजींना अपेक्षित होती. शिक्षण व उद्योग यांचा संबंध जोडला जावा, विद्यार्थ्यांच्या शारीरिक शक्तींचा विकास व्हावा त्याबरोबर त्यांच्या मानसिक शक्ती विकसित व्हाव्यात, या बाबी अंतर्भूत होत्या.

गांधीजींनी प्राथमिक शिक्षणासाठी पुढील पथ्ये सांगितली होती, (१) प्राथमिक शिक्षणासाठी वाटेल तो शिक्षक नेमू नये (२) प्राथमिक शिक्षणात इंग्रजीचा घातक बोजा नसावा (३) खेड्यातील जीवनाशी संबंध राखून खेड्याविषयी आपुलकी टिकविणारे शिक्षण असावे(४) केवळ पाठ्यपुस्तकावर भर नसावा गरजेप्रमाणे त्याचा उपयोग करावा (५) विद्यार्थ्यांची वर्गात भरमसाठ गर्दी नसावी (६) शाळेचे वातावरण सुंदर असावे, आणि (७)परिश्रमाबद्दल विद्यार्थ्यांची स्वभाविकता सतत वाढवून परिश्रमात त्यांना प्रतिष्ठा वाटावी. गांधींनी सांगितलेली ही मूलभूत तत्वे आज आपण पूर्णपणे दुर्लक्षलेली दिसून येतात.

गांधीजी म्हणत माझी शिक्षण पद्धती ही हिंदू, मुसलमान, पारशी, ख्रिस्ती या सर्वांना समान आहे, मी धार्मिक शिक्षणावर भर का दिला नाही? असे मला विचारण्यात येते, माझे उत्तर आहे की, 'मी मुलांना 'आचारशील धर्म' शिकवू इच्छितो आणि तो म्हणजे 'स्वावलंबन', 'आत्मोदधार'.

उच्च शिक्षणाबद्दल ही गांधीजींचे विचार स्पष्ट होते, ते म्हणतात की, 'कॉलेजातील शिक्षणात देखील मी एक प्रचंड क्रांती करू इच्छितो, त्याचा संबंध मी राष्ट्राच्या गरजांशी जोडू इच्छितो, यंत्रे व इतर कला कौशल्य यांचे प्राविण्य संपादन करण्याबाबत काही पदव्या असतील. कॉलेजानी देशातील भिन्नभिन्न कारखान्यांशी संबंध राखावा आणि त्या

कारखान्यांनी आपल्याला लागणाऱ्या तज्ञ विशारदांच्या शिक्षणाची तरतूद करावी. उदाहरणार्थ टाटा कंपनीकडून अशी अपेक्षा बाळगण्यात येईल की, यंत्र विशारद तयार करण्यासाठी त्यांनी राज्य सरकारच्या देखरेखीखाली एक महाविद्यालय चालवावे. अशाच प्रकारे गिरण्यांसाठी आवश्यक लागणारे तज्ञ निर्माण करण्यासाठी गिरणी मालक संघाने एक कॉलेज चालवावे. हीच गोष्ट अन्य उद्योगधंद्यांनी करावी व्यापाऱ्यांचीही आपली कॉलेजेस असावी, आता उरली सामान्य ज्ञान (आर्ट्स), आयुर्वेद व शेती यासंबंधीची कॉलेज. सामान्य ज्ञानाची कितीतरी खाजगी कॉलेज आज स्वतःच्या पायावर उभी आहेत. त्यासाठी राज्यांना स्वतःची कॉलेज काढण्याची गरज नाही. आयुर्वेदासंबंधी कॉलेजेस सरकारमान्य औषधालयाला जोडून काढावीत, आणि ज्याअर्थी हे औषधालय धनिक लोकांना प्रिय होतात त्याअर्थी त्यांनी वर्गणी गोळा करून ती काढावीत. अशी त्यांच्याकडून अपेक्षा करायला हरकत नाही. राहिली शेतकी कॉलेजे, त्यांना जर आपल्या नावांची लाज राखायची असेल तर स्वावलंबी व्हावेच लागेल, या शेतकी विद्यालयातून पदवी बाहेर पदवी घेऊन बाहेर पडलेल्यांचा मला फार निराशा जनक अनुभव आला आहे, त्यांना व्यवहाराचाही अनुभव नसतो, राष्ट्राच्या गरजा भागविणाऱ्या स्वावलंबी शेतावर काम शिकण्याची संधी जर त्यांना मिळाली असती तर पदवी मिळाल्यानंतर आपल्या पैशावर आणखी अनुभव मिळविण्याची पाळी त्यांच्यावर आली नसती.' उच्चशिक्षणासंबंधी गांधीजींचे उपरोक्त विचार पाहिल्यानंतर असे दिसून येते की, समाजातील धनवान लोकांनी तसेच कारखानदारांनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून उच्चशिक्षित व तज्ञ मनुष्यबळ निर्मितीसाठी प्रयत्न करावेत अशी त्यांची अपेक्षा होती, आज जसे आपण पाहतो की महाविद्यालयांनी व उच्च शिक्षण संस्थांनी औद्योगिक क्षेत्राशी MOU ( Memorandum of understanding) करून त्यांच्या गरजेनुसार मनुष्यबळ विकसित करावे, अशी जी संकल्पना मांडण्यात येत आहे, अशाच स्वरूपाची संकल्पना गांधीजींच्या विचारातून आपल्याला दिसून येते. उच्च शिक्षणाच्या बाबतीत सरकारने महाविद्यालय व विद्यापीठे काढण्याऐवजी समाजाने त्यांच्या गरजेनुसार ती निर्माण करावीत अशी खाजगीकरणाची भूमिकाही गांधीजींच्या विचारातून आपल्याला दिसून येते. लोकांनी उच्च शिक्षणाच्या बाबतीतही स्वयंपूर्ण व स्वावलंबी व्हावे, किंबहुना सरकारवरही अवलंबून राहू नये, असाही एक दृष्टिकोन उपरोक्त विचारातून आपल्याला दिसून येतो. महाविद्यालयीन शिक्षण आणि मुलोद्योगी शिक्षण यांच्यात एकसूत्रता व सामंजस्य निर्माण केले पाहिजे असा गांधीजीचा विचार होता.

गांधीजींची शिक्षण विषयक योजना परिपूर्ण व अद्ययावत होती. हे त्यांनी समाज शिक्षण व प्रौढ शिक्षण, स्त्री शिक्षण,विद्यापीठ शिक्षण इत्यादीसंबंधी केलेल्या विचारावरून दिसेल. कामप्रवृत्तीच्या शिक्षणाबद्दल ही त्यांनी स्पष्ट विचार मांडून शिक्षण विचाराच्या क्षेत्रातले अद्ययावत्व व आपल्या विचारसरणीचे सर्वस्पर्शीत्व सिद्ध केले आहे. भारतातीलच नव्हे तर पाश्चात्य विचारवंतही त्यांच्या योजनेकडे आशेने पाहत होते, हे जॉन डयूईच्या पुढील उदगारावरून लक्षात येते, 'गांधीजींची शिक्षण पद्धती ही इतर सर्व शिक्षण पद्धतींच्या पुढचे पाऊल आहे असे मला खात्रीने वाटते. तिच्यात प्रचंड सुप्त सामर्थ्य आहे आणि या क्रांतिकारक शिक्षण- प्रयत्नातून भारतापासून आम्हाला पुष्कळ शिकता येईल अशी मला आशा आहे,'

This journal is © AAASSHER 2023


Scanned with CamScanner

## सारांश

महात्मा गांधी यांनी भारतीय संस्कृती व समाज जीवन याचा संदर्भ घेत शिक्षण विषयक विचार मांडलेले आहेत. ब्रिटीशांनी योजनापूर्वक येथील शिक्षण व्यवस्था मोडीत काढून त्यांना अनुकूल असलेली शिक्षण व्यवस्था निर्माण केली, हे स्पष्ट करताना गांधीजीनी या शिक्षणाने भारतीय लोकांची झालेली दुरावस्था व परावलंबीत्व याविषयीची कारणमीमांसा केली आहे. तसेच ब्रिटिशांच्या शिक्षण व्यवस्थेला पर्याय दिला, माणसाला स्वावलंबी बनविण्यासाठी तसेच त्यांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक व आध्यात्मिक विकास घडविण्यासाठी सुयोग्य असा शिक्षण विचार मांडला आहे.

आचार्य विनोबा भावेंनी नई तालीम संबंधी काढलेले उद्गार भविष्यकाळात ही अनेक चुका केल्यानंतर खरे ठरतील असे म्हणावयास हरकत नाही. विनोबा म्हणाले होते की, "आज जेव्हा बेकारी वाढलेली दिसत आहे, आणि तिचा परिणाम म्हणून विद्यार्थी बेशिस्त व बेजबाबदार होऊ लागलेले आहेत, तेव्हा नेत्यांचे मन नई तालीम कडे वळले आहे. बेकारीचे निवारण व अनुशासनाची -शिस्तीची प्रस्थापना हे नवशिक्षणापासूनचे कमीत कमी लाभ होत. त्याचा मुख्य लाभ आहे नव्या मूल्यांची स्थापना. जेव्हा त्या नव्या नव्या मूल्यांचे आकर्षण वाटेल तेव्हाच नई तालीमचे खरे गुणग्रहण होईल." विनोबा मुल्यात्मक अधिष्ठान असलेल्या शिक्षण व्यवस्थेच्या प्रस्थापनेबद्दल आशावादी दिसून येतात. राष्ट्रीय शिक्षण धोरणामुळे एक नवीन व रचनात्मक शिक्षण व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. या धोरणाची अंमलबजावणी होत असताना गांधीजींच्या विचारातील स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी समाज निर्माण होईल, असा आशावाद बाळगणे प्रेरक ठरेल.

## संदर्भ सूची

१. अकोलकर ग.वि.(संपादक),गांधी विचार दर्शन शिक्षण विचार, प्रकाशक, बाळासाहेब भारदे,अध्यक्ष, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी,गांधी भवन,कोथरूड, पुणे, तिसरी आवृत्ती, १९९४

२. राम शेवाळकर,(संपादक),शिक्षण विचार-विनोबा, ग्रामसेवक मंडळ, वर्धा, आवृत्ती बारावी ऑगस्ट २०११

३. प्राचार्य शिवाजीराव भोसले, हित गोष्टी, अक्षर ब्रह्म प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, एप्रिल २००४

४. त्रिलोकीनाथ चतुर्वेदी (संपादक) साहित्य अमृत, नवी दिल्ली, जानेवारी २०२०

५. मोहन करमचंद गांधी , सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, सिताराम पुरुषोत्तम पटवर्धन (अनुवादक) नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, ३८ वे पुनर्मुद्रण, ऑगस्ट २०१७



Scanned with CamScanner